# ७१ वा दीक्षांत समारोह
## वृत अहवाल

मुंबई
२५ फेब्रुवारी, २०२२

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा ७१ वा दीक्षांत समारोह दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह , चर्चगेट येथे साजरा झाला. महान समाजसुधारक भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ मध्ये स्थापन केलेल्या एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचे "शिक्षणाव्दारे महिलांचे सक्षमीकरण" हे ध्येय आणि "ज्ञानी स्त्री ही एक असीम शक्ति स्त्रोत आहे" हे बोधवाक्य या समारोहाव्दारे पुन्हा एकदा आधोरेखित झाले.

विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. उज्वला चक्रदेव यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि दीक्षांत समारंभ अहवाल सादर केला. विद्यापीठाच्या करोना काळातील अध्यापक आणि शिक्षेकेतर कर्मचार्यांच्या कामाचे कौतुक करून विद्यापीठातील अनेक उपक्रमांची माहिती दिली.

या दीक्षांत समारोहात डॉ. संजय शेडमाके (संचालक, परीक्षा आणि मूल्यमापन मंडळ) यांनी बक्षिसे घोषित केली. यामध्ये एकूण १४,५८९ विद्यार्थिनींना पदवी/पदवीका प्रदान करण्यात आल्या. यात स्नातक पदवीचे (बॅचलर डिग्री) (११,९१२) प्रमाण सर्वाधिक होते. स्नातकोत्तर (२,२७४), स्नातकोत्तर पदवीका (१४०), पदवीधर डिप्लोमा (२१०), प्रमाणपत्र (१२) आणि ४१ पीएच.डी. च्या विद्यार्थीनी पदव्या प्रदान करण्यात आल्या. या दीक्षांत समारंभात स्वायत्त महाविद्यालयातील ४५६ विद्यार्थिनींना पदवी / पदवीका प्रदान करण्यात आल्या. एकूण ७४ सुवर्णपदके, २ रौप्यपदके व १३९ बक्षिसे देण्यात आली. यात १७४ पदवी आणि पदविका, चार विद्याशाखांच्या अंतर्गत (विज्ञान व तंत्रज्ञान , वाणिज्य व व्यवस्थापन , मानविकी आणि अंत:विषय अभ्यासक्रम) प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री उदय सामंत , माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य) यांनी त्यांच्या आंतरजालावरून केलेल्या भाषणामध्ये विद्यापीठाच्या शासनाकडून असलेल्या अनेक अपेक्षांची पूर्ती होईल असे आश्वासन दिले. विद्यापीठाचे अनेक प्रस्ताव मान्य करून शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देईल असे सांगितले. विद्यापीठाचे प्रश्न सोडवण्यासाठी पूर्ण सहकार्य करण्यासाठी त्यांनी दुजोरा दिला. विद्यार्थिनींनी देशाचे नेतृत्व करावे अशी अपेक्षा व्यक्त करू त्यांनी समाजकार्यात पुढे यावे असे आवाहन केले.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, विद्यापीठाचे कुलपती व या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री भगतसिंह कोश्यारी यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात पदवीधारक विद्यार्थिनीचे अभिनंदन केले आणि या परितोषिक प्राप्त सुवर्णकन्यकांनी आपल्या कार्याने आदर्श भारतीय नागरिक बनावे, आपल्या नियोजित क्षेत्रात पारंगत बनावे आणि देशाला आत्मनिर्भर करण्यात संपूर्ण योगदान देण्याचा संकल्प करावा अशी अपेक्षा व्यक्त केली . दिनदयाळ उपाध्याय यांच्या सारख्या अनेक भारतीय नेते आणि क्रांतिवीरांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आयूष्यात ऊतम आदर्श ठेऊन पुढील कार्य करण्यासाठी विद्यार्थिनींना शुभकामना दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी कुलसचिव, डॉ. सुभाष वाघमारे यांनी आभार प्रदर्शन केले.